# पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर
## प्रेस नोट दि.२६/०६/२०१९
## दि.२५/०६/२०१९ रोजी रात्रौ ००/०० वा.ते २४/०० वा.पर्यंतचे दाखल गुन्हे

**भाग-१ ते ५ चे गुन्हे**

**१**

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | खडकी पो स्टे २३६/१९,भादविक ३९२,३४ |
| **फिर्यादी** | फतऊद्दीन राईन,वय-३२ वर्षे,व्यवसाय-रिक्षा चालक,रा.गणेश नगर,बोपखेल,पुणे |
| **आरोपी** | ॲटो रिक्षा नं.एमएच/१२/६९७६ हिचे मधील अनोळखी दोन इसम त्यापैकी १.अंगामध्ये हाफ बाह्याचा ग्रे रंगाचा टि-शर्ट, आकाशी रंगाची जिन्स पॅन्ट, अंदाजे वय २५ वर्षे, उंची अंदाजे ५ फुट ४ इंच २.अंगामध्ये फुल बाह्याचा लाल रंगाचा शर्ट, निळ्या रंगाची जिन्स पॅन्ट, अंदाजे वय २३ वर्षे, उंची अंदाजे ५ फुट (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.२४/०५/२०१९ रोजी १९/५५ वा. खडकी बाजार येथील बस स्टॉप जवळ,पुणे येथे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी हे हे ॲटो रिक्षा न.एमएच/१२/एचसी/३५७७ हिचेमध्ये पॅसेंजर घेवुन खडकी बाजार येथील बस स्टॉप जवळ रिक्षा मधील पॅसेंजर सोडून दिले. त्यानंतर दिवसभर झालेल्या धंद्याचे पैसे रिक्षा मध्ये बसुन मोजत असताना,त्यांचे ॲटो रिक्षाचे शेजारी एक ॲटो रिक्षा थांबली. त्यामधील एक चालक सिटवर व एक मागे बसलेला असे दोन इसमांनी रिक्षामधून उतरुन फिर्यादी यांचे रिक्षाजवळ येवुन,ते मोजत असलेले ३४०/- रोख रक्कम व मोबाईल असा एकुण १०,३४०/- रूपये किचा ऐवज जबरदस्तीने काढून घेवुन,त्यांचे ॲटो रिक्षामध्ये बसुन पळुन गेले आहे. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. प्रताप गिरी ९८२३२९२६३८ |

**२**

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | मुंढवा पो स्टे २०८/१९,भादविक ४९८(अ),३०६,५०६,३४ |
| **फिर्यादी** | सिमा सपकाळ,वय-४८,रा.गुरुकृपा सोसा.केशवनगर |
| **आरोपी** | १.सिंकदर रफिक पटवेकर (पती) व इतर एक,रा.जामा मशिदी समोर फुलेनगर,जि.सातारा (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.२५/०६/२०१९ रोजी १७/२५ वा. ससुन हॉस्पीटल वार्ड नं.२६,पुणे येथे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी यांची मुलगी सौ.कोमल ऊर्फ आशिया सिकंदर पटवेकर,वय-२५ वर्षे हिचे लग्न तीचा पती सिकंदर पटवेकर याचेबरोबर होवुन,ती सासरी वाई,ता.जि.सातारा या ठिकाणी नांदत असताना,दोघांनी संगनमत करून,सौ.कोमल पटवेकर यांना मारहाण करून तीस माहेरी हाकलुन देवुन,ती नोकरी करीत असताना तीस शिवीगाळ करून,तीचे कामाच्या ठिकाणी जावुन,तु केलेली घटस्फोटाची केस मागे घे असे फोन वरून धमकी देवुन,तीला जीवे मारण्याची धमकी देवुन,तीचा शारिरीक व मानसिक छळ केल्याने,त्यांचे त्रासाला कंटाळुन सौ.कोमल पटवेकर हिने दि.१९/०६/२०१९ रोजी राहते घरी स्वतःचे अंगावर डिझेल ओतुन पेटवुन घेतल्याने तीस औषधोउपचाराकरिता ससुन हॉस्पिटल येथे वार्ड नं.२६ मध्ये ॲडमिट केले असता,तीचेवर उपचार चालु असताना ती दि.१९/०६/२०१९ रोजी सकाळी ०८/४५ वा.। मयत झाली आहे. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. घाटगे ९९२३४ २१३३१ |

**३**

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | सहकारनगर पो स्टे ३७८/१९,भादविक ३०६,३४ |
| **फिर्यादी** | अमृत शिंदे,वय-६२ वर्षे,रा.आंबेगाव पठार,कात्रज,पुणे |
| **आरोपी** | दोन इसम व एक महिला (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | सन २०१३ ते आजपावेतो फिर्यादीचे राहते घरी आंबेगाव पठार,कात्रज,पुणे येथे |

**तपशिल** यातील फिर्यादी यांचा मुलगा संजय अमृत शिंदे,वय-३७ वर्षे,रा.श्रेयश गार्डन,मोहननगर, धनकवडी,पुणे याचा यातील नमुद इसमांपैकी एका इसमा सोबत भागीदारीत बांधकाम प्रोजेक्ट चालु आहे. संजय शिंदे याने सदर प्रोजेक्ट मध्ये लोकांकडुन तसेच नातेवाईकांकडुन घेतलेली रक्कम प्रोजेक्टला लावुन सदरचा प्रोजेक्ट पुर्ण केला. सदर इसमाने ठरल्याप्रमाणे सव्वा दोन कोटी रूपये देण्याचे कबुल करून त्याने त्या बदल्यात दिलेले धनादेश वटले नसल्याने,संजय शिंदे यास प्रचंड मानसिक व आर्थिक नुकसान झाल्याने, तसेच इतरांनी दिलेल्या मानसिक त्रासाला कंटाळुन संजय शिंदे याने त्याचे राहते घरातील रूम मध्ये फॅनला गळफास घेवुन आत्महत्या केली.

**त.अंमलदार** म.पो.उप.निरी. एस.एस.सुतार ८६२५०९०३४०

**४**

**पो.स्टे.गुरनं./कलम** स्वारगेट पो स्टे ३१२/१९,भादविक ३०६,५०६,३४

**फिर्यादी** दिपाली श्रीकृष्ण लकडे,वय-२७,रा.पर्वती दर्शन,पुणे

**आरोपी** एकुण चार इसम (अटक नाही)

**गु.घ.ता.वेळ व ठिकाण** दि.१९/०६/२०१९ रोजी १४/४५ वा. ते दि.२०/०६/२०१९ रोजी २३/१५ वा. चे दरम्यान नटराज हॉटेल बोळीत स्वारगेट,पुणे येथे

**तपशिल** यातील फिर्यादी यांचे पती श्रीकृष्ण लकडे,वय-३० वर्षे याना यातील नमुद इसमांपैकी दोन इसमांनी नोकरीला लावण्यासाठी ३ ते ४ लाखाची मागणी करून,तसेच इतर इसमांकडुन श्रीकृष्ण लकड यांनी उसने घेतलेले पैसे ४० टक्के व्याजाचे दराने देण्याची मागणी करून, त्याचा सतत तगादा लावुन,त्यांचे घरी येवुन त्यांना मानसिक त्रास दिल्याने,त्या त्रासाला कंटाळुन,श्रीकृष्ण यांनी विषारी किटकनाशक प्राशन करून आत्महत्या केली आहे.

**त.अंमलदार** पो.उप.निरी. एस.जे.कदम ९८२३६२४५८५

**५**

**पो.स्टे.गुरनं./कलम** समर्थ पो स्टे १४७/१९,भादविक ४२०,३४

**फिर्यादी** एक पुरूष,वय ४६ वर्षे,रा.मंगळवार पेठ,पुणे

**आरोपी** एक इसम

**गु.घ.ता.वेळ व ठिकाण** दि.२२/०४/२०१९ रोजी पासून ते आजपावेतो फिर्यादीचे राहते ठिकाणी मंगळवार पेठ,पुणे येथे

**तपशिल** यातील नमुद इसमाने फिर्यादी यांना स्कॉलर ई-लर्निंग एज्युकेशन मुलुंड,मुंबई यांचे अधिकारी व त्यांचे कर्मचारी यांचशी वेळोवेळी मोबाईलवरुन संपर्क करुन देवुन,त्यांना इयत्ता १० वी व ४ थी च्या शैक्षणिक ई-लर्निंग एज्युकेशन अभ्यासक्रमाच्या सीडी / पेनड्राईव्ह व टॅब देतो तसेच रिफंड देतो असे सांगून,फिर्यादी यांचेकडुन एकुण २३,०००/- रुपये घेवुन,त्यांना पुर्ण अभ्यासक्रम, टॅब व रिफंड ९,०००/- रूपये न देता,फिर्यादी यांना वेगवेगळे कारणे सांगुन त्यांची फसवणुक करण्याचे उद्देशाने,सदर इसमांचे प्रोडक्ट घेण्यास भाग पाडून,त्यांचे ठरल्याप्रमाणे प्रोडक्ट व रिफंड पुर्णपणे न देता फिर्यादी यांची फसवणुक केली आहे.

**त.अंमलदार** पो.उप.निरी. शिवाजी भोसले ९८५०९११३११

**६**

**पो.स्टे.गुरनं./कलम** वारजे पो स्टे २५७/१९,भादविक ४२०,माहिती व तंत्रज्ञान का.क.६६(क)(ड)

**फिर्यादी** एक महिला,वय-३२ वर्षे,रा.शिवणे,पुणे

**आरोपी** अज्ञात मोबाईलधारक व बँकेचे खातेधारक व्यक्ती

**गु.घ.ता.वेळ व ठिकाण** दि.१३/०८/२०१८ ते दि.१२/१२/२०१८ रोजीचे कालावधीत शिवणे येथे ऑनलाईन माध्यमाव्दारे

**तपशिल** यातील नमुद अज्ञात मोबाईलधारक यांनी फिर्यादी यांना कर्ज मंजूर करून देतो असे सांगुन, त्यांचे वेग-वेगळया बँकेचे खात्यावर एकुण ४,२२,५०० /- रूपये ट्रान्सफर करून घेवून,फिर्यादी यांना कर्ज न देता त्यांची आर्थिक फसवणुक केली आहे.

**त.अंमलदार** पो.निरी.(गुन्हे), नंदकुमार बिडवई ९८२३५२३५२७

७

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | वारजे पो स्टे २५८/१९,भादविक ४२०,३४,महाराष्ट्र ओनरशिप फ्लॅट अ‍ॅक्ट कलम ३,४, ५,१३(१)(२) |
| **फिर्यादी** | एक पुरूष,वय ४१ वर्ष,रा.कर्वेनगर,पुणे |
| **आरोपी** | नामांकीत डेव्हलपर्सचे प्रोपरायटर/मॅनेजिंग डायरेक्टर (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | माहे जानेवारी २०१५ ते ऑगस्ट २०१५ चे कालावधी मध्ये काकडे सिटी क्लब हाऊस येथे चालु केलेल्या के.पी.टॉवर्सचे साईट ऑफीस मध्ये |
| **तपशिल** | यातील काकडे सिटी क्लब हाऊस येथे चालु केलेल्या के.पी.टॉवर्सच्या साईट ऑफीसचे प्रोजेक्ट मध्ये टु-बीएचकेच्या चार फ्लॅट करीता फिर्यादी व त्यांचे नातेवाईक असे दोघांनी नामांकीत डेव्हलपर्सचे प्रोपरायटर/मॅनेजिंग डायरेक्टर यांनी त्यांचे सेल्स व मार्केटिंग एक्झिकेटीव्ह यांचेमार्फत १,२१,३७,५६२/- रूपये घेऊन,फिर्यादी यांना फ्लॅटचे अ‍ॅग्रीमेंट करून न देता,फ्लॅट न देता तसेच के.पी. टॉवर्स हा प्रोजेक्ट बंद पडला असतानादेखील,फिर्यादी यांचे घेतलेले पैसे परत न देता त्यांची फसवणूक केली आहे. |
| **त.अंमलदार** | पो.निरी.(गुन्हे), नंदकुमार बिडवई ९८२३५२३५२७ |

८

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | शिवाजीनगर पो स्टे ३१०/१९,भादविक ३८० |
| **फिर्यादी** | एक महिला,वय-४६,रा.मोदीबाग,शिवाजीनगर,पुणे |
| **आरोपी** | अज्ञात इसम |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.१७/०५/२०१९ रोजी १४/०० वा.ते दि.२२/०६/२०१९ रोजी सकाळी १०/३० वा.चे दरम्यान फिर्यादीचे राहते घरी |
| **तपशिल** | यातील फिर्यादी यांचे राहते घर नजरचुकीने उघडे राहिले असताना,कोणीतरी अज्ञात इसमाने त्यांचे राहते घराचे उघडया दरवाजावाटे आंत प्रवेश करून,बेडरूम मधील कपाटातील लॉकरची चावी बनावट चावीने उघडुन त्यामधील सोन्याचे दागिने २,५०,०००/- रू किचे चोरी करून नेले. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. खलाणे ८३८००९६०३० |

**जनसंपर्क अधिकारी,**
**पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर**